# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## " भोगवटा प्रमाणपत्र "

## OCCUPANCY CERTIFICAT

जा.क्र.नांवाशमनपा/नरवि/ 243
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक 6/8/2020
संदर्भ : अर्जदार यांचा अर्ज दि. 22/01/2020.

भोगवटा प्रमाणपत्र धारणकरणा-याचे **नाव 1. शगुन असोसिएस तर्फे श्री. गंगाप्रसाद रामेश्वरजी तोष्णीवाल रा. मौजे. कौठा, नांदेड**

प्रमाणित करण्यात येते की, **भुखंड क्र.6 ते 34,39 व क्लब हाउस गट क्र. 228 मौजे. कौठा, नांदेड**. मिळकती वर रहीवास कारणास्तव **तळमजला, पहिला मजला**, साठी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक EXA/621/17/18-19 दि. 25/09/2017 अन्वये बांधकाम परवानगी क्र. 722/19 दिनांक 06/11/2017 नुसार परवाना धारक वास्तुविशारद/इजिनिअर/स्ट्रक्चर इजिनिअर श्री. सौरभ करडीकर यांचा परवाना क्रमांक CA/2011/51830 यांच्या देखरेखीत सदर इमारतीचे बांधकाम झालेले आहे. **Plinth Level** चे प्रमाणपत्र क्रं. **4884,485,1361 दि.26/3/2018,17/5/2018,09/07/2018** नुसार घेतलेले आहे. तसेच प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी केलेल्या फेर बदलापैकी नकाशामध्ये हिरव्या रंगाने दर्शविलेल्या दुरुस्त्या नुसार चे बदल हे नियमानुसार असल्याने त्यास मान्यता देण्यात येत असुन त्यानी सादर केलेल्या पुर्णत: प्रमाणपत्राच्या आधारे सदर बांधकाम झालेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र खालिल प्रमाणे/अटीवर देण्यात येते.
सदरील भुखंडाच्या हद्दी व चतु:सिमा बाबत वाद उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारका/विकाससक आणि अर्जदार तथा वास्तुविशारद स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची राहील.

1. सदर भोगवटा प्रमाणपत्र इमारतीचे मर्यादे पर्यतचे आहे. इमारतीचे स्थानांकन, भुखंडाचे क्षेत्र, हद्दी चतु:सिमा इत्यादी बाबत वाद निर्माण झाल्यास तसेच विकास योजने नुसार भखंडाचे स्थाना बाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारवर राहील. त्याकरिता महानगरपालिकेची जबाबदारी राहरणार नाही.
2. सदरच्या भोगवटा प्रमाणपत्रा व्यतीरीक्त भविष्यात प्रत्येक्ष जागेवर अतिरिक्त बांधकाम आढळल्यास ते अनाधिकृत विनापरवानगी समजुन त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
3. बांधकाम परवानगी पत्र क्रं. 722/19 दि. 06/11/2017 मध्ये नमुद केलेल्या अटी व करारनामा मधील नमुद अटी अर्जदारावर बंधनकारक राहील.
4. विकासकावर विकसीत इमारतीचे बाबत इतर कायद्यानुसार असलेल्या तरतुदी प्रमाणे सर्व बाबीची पुर्तता करण्याची जबाबदारी राहील.
5. सोबतच्या नकाशा प्रमाणे तळमजला, पहिला मजला, रहीवास कारणास्तव साठी एकुण बांधकाम क्षेत्र **4673.00** चौ. मी.करिता भोगवटा प्रमाणपत्र अटी व शर्तीवर देण्यात येत असुन चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय) च्या प्रमाणाबाहेर जाता येणार नाही.
6. विमानतळ प्राधिकरण यांचे कडील नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
7. शासन/महानगरपालिका/ मा. उच्च न्यायालया कडुन होणारे निर्णय बंधनकारक राहतील. व कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.
8. DCPR मधिल नियमानुसार जागेवर रस्ते, पाण्याचा निचरा होण्याच्या नाली, पाणि पुरवठा वाहिणी, ड्रेनेज लाईन, इलेक्ट्रीकल लाईन इत्यादी कामे झाल्यानंतरच गाळे हास्तांतर करावे.
9. Fire act च्या आवश्यकतेनुसार अग्निशमन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय गाळे हास्तांतर करु नये.
10. खुल्या जागेतील कलब हॉऊस हा नागरिकांच्या सोई करीता असून सार्वजनिक वापराकरिता सोसायटी तयार करून त्यांच्या ताब्यात देवुन तसे मालमत्ता विभाग मनपा यांना कळविणे बंधनकारक राहील.
11. विकास नियंत्रण व प्रोत्साहान नियमानुसार सर्व नियम व मनपाने वेळोवेळी दिलेले निर्देश पाळणे बंधनकारक राहील.
12. मनपा, ड्रेनेज विभाग यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार PVC Pipe line/ Chamber ची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी आपली राहील.

**(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)**

सहाय्यक संचालक नगररचना
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत:

1. मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीसाठी सादर.
2. सहाय्यक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय क्र. 6. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव
3. मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
4. अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना माहिती व कार्यवाहीस्तव.